# ओएनजीसी (डब्ल्यूओयु) कर्मचारी संघटना

<u>मान्यताप्राप्त युनियन</u>

बंधू - भगिनींनो,

ऑफशोअरमधिल कर्मचाऱ्यांना सूचित करण्यात येते कि, सर्व रिग्ज, प्लॅटफार्म्स तसेच संबंधित इतर विभागांमधील Executive Committee ची पुन:रचना करण्याचे ठरविले असून, आपल्या रिग्ज, प्लॅटफार्म्स वर सध्या आस्तित्वात असलेल्या Executive Committee मध्ये काही बदल करायाचे असल्यास अथवा सदर कमिटी आहे तशीच ठेवायची असल्यासही कमिटीमधील पदाधिकाऱ्याचे नांव, पदनाम, सीपीएफ क्र. व युनियन मधील पद आदी माहितीसह युनियनच्या जनरल सेकेटरींकडे लिखित स्वरुपात आणून द्यावी.

त्याचप्रमाणे Food Committee तील सभासदांचीही निवड करावयाची असून, प्रत्येक शिफ्टमधील आपले दोन सभासद अशा एकूण आठ सभासदांची निवड करावयाची आहे. सदर Food Committee मध्ये अधिकाऱ्यांव्यतिरीक्त इतर स्टाफचे सभासद हे मान्यताप्राप्त युनियनचेच असायला हवेत याचे प्रत्येकाने काटेकोरपणे पालन करावे. वरीलप्रमाणे दोन्ही कमिट्यांच्या पदाधिकाऱ्यांची यादी लेखी स्वरुपात एका महिन्याच्या आत कर्मचारी संघटनेच्या कार्यालयात आणून द्यावी. पदाधिकाऱ्यांची निवड करताना चारही शिफ्टमधील सभासदांशी विचार विनिमय करुन अंतिम निवड केल्यावर चारही शिफ्टमधील जास्तित जास्त सभासदांच्या सह्या घ्याव्यात जेणेकरुन निवडीबाबत नंतर भविष्यात कोणतेही वाद वा नाराजी रहाणार नाही याची काटेकोरपणे काळजी घ्यावी. कारण प्रत्येक सभासद हा कर्मचारी संघटनेसाठी अत्यंत महत्वाचा असून यातील बहुसंख्य सभासद हे कोणताही वैयक्तिक स्वार्थ अथवा पदाची अपेक्षा न ठेवता अत्यंत तळमळीने व निष्ठेने सदैव संघटनेसाठी काम करीत असतात. व अश्या निष्ठावंत सभासदांच्या पाठबळावरच कर्मचारी संघटनेचा लौकीक व यश अबाधित आहे.

सर्व सभासदांनी रात्रंदिवस केलेल्या प्रचंड मेहनतीमुळे कर्मचारी संघटना सतत व सलग तिसऱ्या वेळी निवडून आली असून आपण केलेल्या अथक प्रयत्नांसाठी कर्मचारी संघटना आपली शतश: ऋणी आहे. कर्मचारी संघटना अधिक मजबूत व कार्यतत्पर बनून ऑफशोअरमधील कर्मचाऱ्यांच्या समस्या तत्परतेने सुटाव्यात यासाठी वरील प्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे.

निवड झालेल्या पदाधिकाऱ्यांना सूचित करण्यात येत आहेकि, जे पदाधिाकरी मुंबईमध्ये वा आसपास रहात असतील त्यांनी आपल्या १४ दिवसांच्या ऑफमधील काही वेळ युनियन ऑफीससाठी देणे आवश्यक आहे. ऑफशोअरमधील कर्मचाऱ्यांच्या सूचना किंवा समस्या त्यांनी कर्मचारी संघटनेच्या कार्यालयात थेट मांडून त्याबाबतची कार्यवाही रिग/प्लॅटफार्मवर समाधानकारकपणे सांगू शकाल. त्यामुळे ऑफशोअरमधील पदाधिकाऱ्याने युनियन ऑफीसमध्ये येणे / संपर्क ठेवणे महत्वाचे आहे.

आपण कर्मचारी संघटनेवर अतुट विश्‍वास दाखवित कर्मचारी संघटनेला सतत तिसऱ्यांदा विजयी केले असून हा विश्‍वास कर्मचारी संघटना निश्‍चितपणे सार्थ करुन दाखविणार असून पे-रिव्हिजन, 2004 MOU तसेच नविन R&P यामध्ये सर्व कर्मचाऱ्यांना जास्तित जास्त लाभ मिळवून देण्यास वचनबध्द आहे.

कामगार एकता झिंदाबाद !        कर्मचारी संघटना झिंदाबाद !!

आपला नम्र,

दि. ३ सप्टेंबर २०१८

(प्रदीप मयेकर) सरचिटणीस